वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ
**"अवलंबित्व" ठरविण्यासाठी उत्पन्नावरील**
**मर्यादा सुधारण्याबाबत...**
शासकीय कर्मचा-याचे आईवडील आणि
अविवाहित व घटस्फोटीत बहिणींसंदर्भात.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
क्रमांक : वैखप्र- २०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०११.

**वाचा:-** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९२/६३४/प्र.क्र.६५/आरोग्य-७, दिनांक २१ ऑगस्ट, १९९२.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक १८ ऑगस्ट, १९९९.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.९९/आरोग्य-३, दिनांक २० फेब्रुवारी, २००३.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम २(३) अन्वये प्रतिपूर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबाची व्याख्या विहित करण्यात आली आहे. या व्याख्येत वरील (३) येथील आदेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार सद्य:स्थितीला शासकीय कर्मचा-याचे आईवडील यांचे एकूण उत्पन्न हे जर दरमहा **रु.१,५००/-** इतके मूळ निवृत्ती वेतन घेणा-या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचा-यास मिळणा-या वित्तलब्धीच्या मर्यादेत असेल तर ते वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचा-यांवर अवलंबित असल्याचे मानले जाते आणि त्यांच्या आजारपणावरील उपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती शासकीय कर्मचा-यास अनुज्ञेय ठरते.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-याच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यात आल्यानंतर वरील मूळ निवृत्तीवेतन वा दरमहा कमाल उत्पन्नाची मर्यादा सुधारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. **या संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-**

(अ) शासकीय कर्मचा-याच्या आईवडीलांना (i) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा, (ii) निवृत्तीवेतन मिळत नसले तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा, (iii) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे, **दरमहा रु.३,५००/-** इतके मूळ निवृत्तीवेतन घेणा-या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचा-यास मिळणा-या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रु.३,५००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचा-यावर अवलंबित असल्याचे मानले जाईल.

(ब) वरील तरतूद शासकीय कर्मचा-यांच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्याच्यावरील अवलंबित्व ठरविताना तसेच महिला शासकीय कर्मचा-याने तिच्या आईवडीलांऐवजी सासू-सास-यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासू-सास-यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागू असेल.

३. **हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू असतील.**

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९०/सेवा-५, दिनांक २६.९.२०११ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१११११६११२३४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. वा. राणे )
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,(सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,
मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई. (दोन प्रती),
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती),
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस, पुणे (२ प्रती),
विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येक २ प्रती),
जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे) (प्रत्येक २ प्रती),
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,(२ प्रती),
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परीक्षा) मुंबई. (२ प्रती),
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परीक्षा), नागपूर. (२ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती),
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
चीफ ऑडिटर लोकल फंडस अकाऊंटस, मुंबई (१० प्रती),
सर्व कोषागार अधिकारी, (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती),
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती),
संचालक, आयुर्वेद, मुंबई.(२५ प्रती),
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई (२५ प्रती),
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई (२ प्रती),
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती),
वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, (२ प्रती),
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२.	मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.